# योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांचे आध्यात्मिक बोधामृत

## विषयसूची


१. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांचे हिमालयवासी सद्गुरु प.पू. आनंदस्वामीजी ! ६

२. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांचा संक्षिप्त परिचय ८

३. 'ॐ आनंदं हिमालयं' संप्रदायाचा सिद्ध मंत्र आणि त्याची फलश्रुती ११

४. योगतज्ञ प.पू. दादाजी यांच्या प्रस्तुत ग्रंथाच्या निर्मितीमागील उद्देश १२

५. ग्रंथाच्या संकलकांचा परिचय १३

६. ग्रंथाचे मनोगत १५

७. ग्रंथातील काही संज्ञांची स्पष्टीकरणे १७


## ग्रंथाची अनुक्रमणिका

(प्रकरणातील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**प्रकरण १ : योगतज्ञ प.पू. दादाजी यांचे मौलिक सुविचार** **१८**

१ अ. मानवी जीवनाचे सार्थक कसे करावे ? १८

१ आ. कर्म कसे करावे ? १९

१ इ. चांगल्या आचार-विचारांचे महत्त्व १९

१ ई. सत्याची कास कधीही सोडू नये ! २०

१ उ. सकारात्मकतेमुळे होणारे लाभ २०

१ ऊ. प्रयत्न आणि आत्मविश्वास यांमुळे यश मिळणे २०

१ ए. मन शुद्ध कसे करावे ? २१

१ ऐ. गुणसंवर्धन कसे करावे ? २२

१ ओ. स्वभावदोष-निर्मूलनासाठी करावयाचे प्रयत्न २४

१ औ. चुकांकडे कसे पहावे ? २४

१ अं. अहंकार दूर करण्यासाठी कोणते प्रयत्न करावेत ? २५

१ क. आत्म्याचे सौंदर्य आणि त्याचे अंतिम ध्येय २५

१ ख. आनंद कसा मिळवावा ? २६

**प्रकरण २ : योगतज्ञ प.पू. दादाजी यांचे विविध विषयांवरील मार्गदर्शन ३०**

२ अ. मनुष्यजन्माचे श्रेष्ठत्व २ आ. जीवन कसे जगावे ? ३०

२ इ. मनाचे आरोग्य ३३

२ ई. षड्रिपू-निर्मूलन (स्वभावदोष-निर्मूलन) ३५

२ उ. कर्मबंधन आणि त्यातून मुक्त होण्याचे उपाय ३७

२ ऊ. दुःखावर मात करून आनंदप्राप्ती कशी करावी ? ४१

२ ए. अध्यात्माचे महत्त्व ४८

२ ऐ. साधना कशी करावी ? २ ओ. संतांचे श्रेष्ठत्व ४९

२ औ. गुरूंचे महत्त्व, वैशिष्ट्ये आणि कार्य ५६

२ अं. श्रद्धेचे महत्त्व आणि लाभ २ क. भक्त आणि भक्ती ६०

**प्रकरण ३ : योगतज्ञ प.पू. दादाजी यांचे विविध विषयांवरील लेखन**
(ग्रंथाच्या शेवटी दुसऱ्या रंगीत पानावरील वरचे छायाचित्र पहा.) ७७

३ अ. आत्मा आणि जन्म-मृत्यूचे चक्र ७७

३ आ. बुद्धीवादाची मर्यादा आणि अध्यात्माचे महत्त्व ७९

३ इ. साधनेतील टप्पे आणि मनःशांतीसाठी साधनेची आवश्यकता ८०

३ ई. मन समर्थ कसे बनवावे ? ८१

३ उ. कर्म करतांना भावना कशी असावी ? ८३

३ ऊ. परमेश्वरावर श्रद्धा ठेवण्याचे महत्त्व ८४

३ ए. परमेश्वरप्राप्तीसाठी आचरण्यास सोपा असलेला ‘भक्तीयोग’ ! ८५

३ ऐ. ‘ॐ’चा जप केल्याने होणारा लाभ ९०

३ ओ. मंत्र आणि गुरुमंत्राचे महत्त्व ९०

३ औ. खरे ज्ञान आणि त्याची प्राप्ती ३ अं. हिंदु धर्माचे श्रेष्ठत्व ९१

**प्रकरण ४ : योगतज्ञ प.पू. दादाजी यांचा पत्रव्यवहार** १०८

४ आ २ अ. महाराष्ट्रभूषण शिवशाहीर (कै.) बाबासाहेब पुरंदरे यांनी योगतज्ञ दादाजी यांच्या दीर्घायुष्यासाठी जगदंबेच्या चरणी केलेली पत्ररूपी प्रार्थना ! ११०

**प्रकरण ५ : योगतज्ञ प.पू. दादाजी यांच्याविषयीच्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती** ११६

**प्रकरण ६ : योगतज्ञ प.पू. दादाजी यांचे आध्यात्मिक सामर्थ्य दर्शवणाऱ्या वैज्ञानिक चाचण्या** १२२

६ इ. योगतज्ञ दादाजी यांच्या छायाचित्रातून पुष्कळ चैतन्य प्रक्षेपित होत असल्याचे दर्शवणारी वैज्ञानिक चाचणी १२३

६ ई. योगतज्ञ दादाजींनी दिलेल्या संस्कारित ३ सूर्यप्रतिमांतून पुष्कळ तेजतत्त्व प्रक्षेपित होत असल्याचे दर्शवणारी वैज्ञानिक चाचणी १२४

**प्रकरण ७ : योगतज्ञ प.पू. दादाजी यांच्या देहत्यागाच्या वेळच्या कुंडलीतील वैशिष्ट्यपूर्ण ग्रहयोग** १२७

**साधकांनो, परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांचे कृपाशीर्वाद घ्या !**

‘सनातन संस्थेचे सद्गुरु प.पू. डॉ. जयंतराव आठवले हे आपल्या साधकांना भरभरून कृपामृत वाटण्यास सिद्ध असतात. यासाठी सर्व श्रद्धावंत साधकांनी गुरुपौर्णिमेच्या दिवशी त्यांच्या चरणांवर नतमस्तक होऊन त्या कृपारूपी अमृताची गोडी चाखावी आणि त्यांचे आशीर्वाद घ्यावेत.’ **– योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन** (वर्ष २००७ च्या गुरुपौर्णिमेनिमित्त दिलेला संदेश) F (DrK-St + P15StS + PStDV-L + PR 6 + PR 42Ch-PStDV2)

# विषयसूचीतील क्रमांक ६

## ग्रंथाचे मनोगत

‘ईश्वराचे सगुण रूप असलेल्या संतांचे या भूतलावरील कार्य परम कल्याणकारी असते. ‘मानवांना साधना करण्यासाठी प्रेरित करणे’, हे कार्य ते करतात. त्यांना साधकांचा उद्धार करण्याची तळमळच लागलेली असते. या तळमळीपोटी ते अध्यात्म, साधना इत्यादी विविध विषयांवर मार्गदर्शनही करतात. असेच मार्गदर्शन केलेली एक महान साक्षात्कारी विभूती म्हणजे योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन !

योगतज्ञ दादाजी यांना वाचासिद्धि (बोलण्यानुसार घडणे) प्राप्त होती. ते आवश्यक तेवढेच आणि मोजक्या शब्दांत बोलत अन् तेच त्यांचे मार्गदर्शन ठरे. त्या मार्गदर्शनात अध्यात्माचे सारच येत असे. योगतज्ञ दादाजी यांच्या वाणीतील चैतन्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाचा प्रभाव उपस्थितांवर पडून त्यांपैकी अनेक जणांना योगतज्ञ दादाजी यांच्या दिव्यत्वाची प्रचीती आली आहे आणि अनेकांनी त्यांच्या मार्गदर्शनानुसार साधना आरंभ केली आहे.

योगतज्ञ दादाजी यांचे लिखाणही मोजक्या शब्दांत असे. त्यांनी वेळोवेळी विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके इत्यादींतून ‘जीवन कसे जगावे ?, साधना, भक्ती, योगमार्गांचे महत्त्व’ इत्यादी अनेक विषयांवर लिखाण केले. हे लिखाण केवळ विविध साधनामार्गांनुसार साधना करणाऱ्यांसाठीच नव्हे, तर सर्वसामान्य लोकांसाठीही उपयुक्त आहे. ‘या लिखाणातील ज्ञान अनुभूतीजन्य आहे’, असे जाणवते. या लिखाणावरून योगतज्ञ दादाजी यांच्या उच्च आध्यात्मिक स्थितीची कल्पनाही येते.

या ग्रंथात योगतज्ञ दादाजी यांचे मौलिक सुविचारही दिले आहेत.

वाचकांनी प्रतिदिन यांतील १ सुविचार वाचावा, त्याचे चांगल्या प्रकारे मनन करावे, तो अंतःकरणात साठवावा आणि आचरणातही आणावा !

‘योगतज्ञ दादाजी यांची वाणी आणि लेखणी यांतून अवतरलेल्या या मार्गदर्शनरूपी ‘ज्ञानगंगे’चा लाभ अध्यात्ममार्गावर वाटचाल करणाऱ्या प्रत्येक जिवास होऊ दे आणि त्या प्रत्येक जिवाकडून तसे आचरणही होऊ दे’, ही योगतज्ञ दादाजी यांच्या पवित्र चरणकमली प्रार्थना !’ – **संकलक**

## योगतज्ञ दादाजी यांच्या मार्गदर्शनाचा प्रसार करण्याच्या संदर्भात दैवी शक्तींनी स्वप्नदृष्टांताद्वारे दिलेला संदेश !

‘योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांची दैवी वाणी आणि लेखणी यांतून प्रगट झालेले मौलिक सुविचार अन् मार्गदर्शन प्रस्तुत ग्रंथाद्वारे जनमानसापर्यंत पोचवण्याचे कार्य करतांना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.’ – **दैवी शक्ती**

(‘आज पहाटेच्या वेळी दैवी शक्तींनी स्वप्नदृष्टांताद्वारे मला वरील संदेश दिला. ‘या ग्रंथनिर्मितीसाठी आणि ग्रंथातील मार्गदर्शनाचा प्रसार होण्यासाठी दैवी शक्ती कशा कार्यरत आहेत’, हे यावरून लक्षात येते.’ **– श्री. अतुल केशव पवार, २३.१०.२०२१**)

## योगतज्ञ दादाजी यांच्या चरणी ग्रंथ अर्पण !



प्रस्तुत ग्रंथ हा योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांच्या कृपेमुळे आणि त्यांच्या अव्यक्त संकल्पानेच प्रकाशित होत आहे. यासाठी हा ग्रंथ त्यांच्या चरणी अर्पण !